**महाराष्ट्र शासन**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
दालन क्र. ४३९, चौथा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२
**Email Id:** tnt1.sesd-mh@mah.gov.in

---

**क्रमांक :** संकीर्ण २०२३/प्र.क्र. १५१/टिएनटि-१, दिनांक: ०९ जून, २०२३.

**प्रति,**

१.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
३.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

शासन निर्णय
www.govtgr.com

**विषय :** **<u>शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०१९ मधील परिच्छेद क्र. ३ संदर्भात स्पष्टता आणणेबाबत.</u>**

**संदर्भ:** १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टीएनटी-१, दि. ०७.०२.२०१९
२. शासन अधिसूचना, असाधारण क्र.४०९, दि.२६.११.२०१९

महोदय,

शासन निर्णय, दिनांक ०७.०२.२०१९ अन्वये राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. यामधील परिच्छेद क्र. ३ अन्वये, इयत्ता १ ली ते ८ वी च्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षकांच्या पदांकरीता अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ विमुक्त जाती/भटक्या जमाती-ब/भटक्या जमाती-क/ भटक्या जमाती-ड/ इतर मागास प्रवर्ग/विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग/ खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/ दिव्यांग उमेदवार इतर प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी पात्रता गुणांमध्ये ५ टक्के सूट देण्यात आली आहे. तथापि, शासन निर्णय दिनांक ७.२.२०१९ मधील परिच्छेद ३ मध्ये केंद्रशासन व राज्यशासन आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा असा स्पष्ट उल्लेख नसल्याने CTET उत्तीर्ण आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील (EWS) उमेदवारांना सदर परीक्षेतील गुणांमध्ये ५ % सूट देण्याबाबत संभ्रम निर्माण झाल्याचे दिसते. त्यामुळे यासंदर्भात विविध संघटनांची व लोकप्रतिनिधीची निवेदने प्राप्त होत आहेत.

याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजे केंद्र शासन व राज्य शासन आयोजित अथवा केंद्र शासन किंवा राज्य शासन यांनी प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षा अशी स्पष्ट व्याख्या व पात्रता गुणांमधील सूट

CS Scanned with CamScanner

याबाबतची तरतूद महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नमूद आहे.

तसेच संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय दिनांक ०७.०२.२०१९ मध्ये देखील याप्रमाणे शिक्षक पात्रता परीक्षेची व्याख्या करण्यात आली आहे.

०३. यास्तव स्पष्ट करण्यात येते की, सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३ येथील पात्रता गुणांच्या टक्केवारीत देण्यात आलेली सूट ही केंद्र शासन व राज्य शासनाद्वारे अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अभिकरणाद्वारे आयोजित शिक्षक पात्रता परीक्षेकरीता लागू आहे.

आपला,

(म.भि.काळे)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय
www.govtgr.com

Scanned with CamScanner